सकाळ



हॅप्पी पेरेंटिग...

डॉ. सुनील गोडबोले



# हॅप्पी पेरेंटिग : जिद्द, चिकाटी

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (20 May 2023)

अपयशातून ‘रबराच्या बॉल’ प्रमाणे उसळी मारून परत ‘यशाकडे’ जाण्यासाठी जशी रबरासारखी लवचिकता (Resilience) लागते, तशीच पुन्हा झगडण्याची हिंमत, चिकाटी लागते! अँजेल डकवर्थ या मानसतज्ज्ञाच्या मते, यशासाठी फक्त कुशाग्र बुद्धी आणि अभ्यासातले गुण पुरत नाहीत, तर बरोबरीने जिद्द (Grit) लागते. त्यांच्या मते जिद्द निर्माण होण्यासाठी प्रचंड आवड (Passion) आणि चिकाटी (Perseverance) हे दोन गुण मुलांमध्ये लहान वयापासूनच रुजवायला पाहिजेत.

मिलेनियल पिढीमध्ये (इसवीसन २००० च्या आगेमागे) मुलांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून, त्यांचे बालपण आनंदातच गेले पाहिजे या भावनेतून त्यांना स्पर्धेपासून दूर ठेवले जाऊ लागले, परीक्षेचा ताण पडणार नाही याची काळजी घेतली गोली, मेरीट लिस्ट पद्धत बंद झाली, गुणांनुसार इयत्ता ठरविण्याची रचना बंद झाली.

नापास करणेच थांबवले गेले. याचे फायदे नक्की झाले; परंतु यातून ‘यशासाठी झगडण्याची ईर्षाच’ संपली. परिस्थिती प्रतिकूल असेल तर काय करायचे त्याचे सहज शिक्षण संपले. बांधेसूद चौकटीच्या बाहेर विचार करण्याचे कौशल्य गायब झाले. यामुळे ही पिढी प्रत्यक्ष जगात शिरताना झगडायला, आव्हाने स्वीकारायला कमी पडतीय, हे तज्ज्ञांना लक्षात यायला लागले.

मुलांमध्ये ही जिद्द, चिकाटी निर्माण करण्यासाठी आपण काय करू शकतो?

1) मुलांच्या स्वप्नांवर, ध्येयावर चर्चा करा. लहान वयात मुलांना ड्रायव्हरपासून अंतराळवीरापर्यंत वाटेल ते व्हावेसे करत असते. ते ऐकून घ्या. स्वप्ने फुलवत राहा.

2) जिद्दीने, चिकाटीने यशस्वी होणाऱ्या माणसांच्या गोष्टी मुलांना सांगा. शक्य झाले, तर अशा व्यक्तीची मुलांशी गाठ घालून द्या.

3) निसर्गातून शिकू द्या. उन्हाळ्यात संपूर्ण वाळणारे झाड परत पावसाळ्यात हिरवेगार होते ही चिकाटी नाही का? काँक्रीटच्या रस्त्यातून, कुंपणातल्या फटीतून मुळे धरून उगवणारे गवत/ झुडूप ही चिकाटीच.

4) रोजच्यापेक्षा थोडे ‘अवघड’ करण्याचा प्रयत्न! मुलांची जिद्द वाढवण्याची ही सुरुवातीची युक्ती. मूल १०० मीटर पळू शकत असेल, तर १५० मीटरचे लक्ष्य द्या. त्यात यश मिळू द्यात. आपोआपच पुढचे ध्येय दिसू लागेल.

5) चौकटीबाहेर पडण्याचे विचार करू द्यात! ते मिळवण्यासाठी काय प्रयत्न करावे लागतील, त्याला प्रोत्साहन द्या.

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

[www.chiranjeevgodbole.com](http://www.chiranjeevgodbole.com)